# प्रेस नोट

दि. ०४/०७/२०१८

**लोकसेवक एस एस केंद्रे भुकरमापक वर्ग ३ भुमी अभिलेख कार्यालय पाथर्डी जि. अहमदनगर यांनी ८,०००/– रुपयाची लाच मागणी केलेवरुन गुन्हा दाखल.**

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, तक्रारदार यांचेकडे केलेल्या मोजणीप्रमाणे नकाशा तयार करुन प्रकरण निकाली काढण्यासाठी भुमी अभिलेख कार्यालय पाथर्डी येथे नेमणुकीस असलेले एस एस केंद्रे, भुकरमापक यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वत:चा सांपत्तीक फायदयासाठी तक्रारदार यांचेकडे दिनांक २८/०५/२०१८ रोजी,तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन, पडताळणी केली असता लोकसेवक केंद्रे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/– रुपयाची लाच मागणी करुन करुन तडजोड अंती ८०००/–रुपये मागणी करुन ती मिळवण्याचा प्रयत्न केला म्हणुन लोकसेवक केंद्रे यांचे विरुध्द पाथर्डी पोलीस स्टेशन येथे गुरनं ४०५/२०१८ ला.प्र.का.क ७,१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक डॉ.पंजाबराव उगले ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर ,पदाधिकारी शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अहमदनगर येथे श्री.किशोर चौधरी ,पोलीस उप अधीक्षक यांचेशी संपर्क साधावा.त्यासाठी १०६४ हा निशुल्क टोल फ्रि नंबर सुरु करण्यात आलेला आहे

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | **पोलीस उप अधीक्षक कार्यालय,जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर,सावेडी,अहमदनगर** |
| **फोन नंबर** | **०२४१–२४२३६७७** |
| **टोल फ्रि नंबर** | **१०६४** |

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक वभाग,
अहमदनगर